# १६. स्वराज्य ते साम्राज्य


१६.१ संतांची कामगिरी
१६.२ स्वराज्याची स्थापना व विस्तार
१६.३ मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम
१६.४ शिवकालीन राज्यव्यवस्था
१६.५ शाहू महाराजांची सुटका
१६.६ पेशवेकाळ
१६.७ कला, स्थापत्य, साहित्य
१६.८ व्यापार, उद्योग व समाजजीवन


अल्लाउद्दीन खल्जीने देवगिरीच्या यादवांचा पराभव केला आणि दक्षिण भारतात दिल्ली सुलतानांची राजवट सुरू झाली. खल्जीनंतर तुघलक आणि बहमनी या सत्तांनी महाराष्ट्रात राज्य केले. पुढे बहमनी राज्याचे विघटन होऊन महाराष्ट्रात निजामशाही आणि आदिलशाही या सत्तांचा अंमल होता. दक्षिणेच्या प्रदेशात प्रवेश करण्याचा प्रयत्न मुघलांनी सुरू केला होता. त्यातून निजामशाही संपुष्टात आली. अशा पार्श्वभूमीवर सतराव्या शतकाच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठी सत्तेचा उदय झाला.

## १६.१ संतांची कामगिरी

अंधश्रद्धा व कर्मकांड यांचा समाजावर जबरदस्त पगडा होता. लोक दैववादाच्या आहारी गेले होते. त्यांची प्रयत्नशीलता थंडावली होती. रयतेची स्थिती फारच हलाखीची होती. अशा परिस्थितीत समाजात चैतन्य निर्माण करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रातील संतांनी केले.

महाराष्ट्रात श्रीचक्रधर स्वामी, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास यांच्यापासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांतून आलेल्या संतांनी पुढे चालवली. या संतपरंपरेमध्ये समाजातील सर्व स्तरांतील लोक होते. उदा., संत चोखामेळा, संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत सेना, संत शेख महमंद इत्यादी. त्याचप्रमाणे या संतमंडळीत संत निर्मळाबाई, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई सिऊरकर यांसारख्या स्त्रियाही होत्या.

संतांनी लोकांच्या मनात आपला प्रदेश, आपली भाषा, आपले साहित्य, आपली संस्कृती यांविषयी स्वत्वभावना निर्माण केली. लोकांना समतेचा संदेश दिला. माणुसकी व मानवताधर्म शिकवला. एकमेकांवर प्रेम करावे, एकत्र यावे व एकजुटीने राहावे ही त्यांची शिकवण होती. संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. परचक्र किंवा दुष्काळजन्य परिस्थिती किंवा निरनिराळ्या प्रकारची निसर्गसंकटे यांतून दैनंदिन जीवन जगताना संतांचा भक्तीचा उपदेश हा लोकांचा आधार ठरला. संतांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

## १६.२ स्वराज्याची स्थापना व विस्तार

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात निजामशाही व आदिलशाही या दोन राजवटी महाराष्ट्रामध्ये प्रस्थापित झाल्या होत्या. या दोन शाह्यांच्या दरबारात पराक्रमी मराठा सरदारांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. या मराठा सरदारांच्या जहागिरी सह्याद्रीच्या परिसरात अत्यंत दुर्गम भागात होत्या. या सरदारांचे अस्तित्व एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणेच होते. शहाजीराजे भोसले हे निजामशाहीतील एक मातब्बर सरदार होते. निजामशाहीच्या अस्तानंतर त्यांनी आदिलशाहीची मनसबदारी पत्करली. शहाजी राजे पराक्रमी, धैर्यशील, बुदधिमान आणि श्रेष्ठ राजनीतिज्ञ होते. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तमिळनाडू येथील अनेक प्रदेश त्यांनी जिंकून घेतले होते. पुणे, सुपे, शिरवळ, इंदापूर, चाकण येथील प्रदेश त्यांना जहागीर म्हणून मिळाले होते. स्वराज्य स्थापन करावे ही त्यांची स्वतःची तीव्र


शहाजीराजे

आकांक्षा होती. म्हणूनच त्यांना स्वराज्याचे संकल्पक म्हटले जाते. त्यांनी शिवराय आणि जिजाबाई यांना विश्वासू आणि कर्तबगार सहकारी बरोबर देऊन बंगळूरहून पुण्याला पाठवले.

शहाजीराजांचे स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी वीरमाता जिजाऊंनी शिवरायांना प्रोत्साहन दिले. त्या कर्तबगार आणि द्रष्ट्या राजनीतिज्ञ होत्या. स्वराज्य स्थापन करण्याच्या कामात त्यांनी शिवरायांना सातत्याने मार्गदर्शन केले आणि त्यादृष्टीने उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था केली.



वीरमाता जिजाबाई



छत्रपती शिवाजी महाराज

स्वराज्याची संकल्पना शहाजीराजे भोसलेंनी मांडली व तिची पूर्तता त्यांचे पुत्र शिवाजी महाराज यांनी केली. शिवरायांनी स्वराज्य स्थापनेची सुरुवात मावळ भागात केली. त्यांच्या अत्यंत पराक्रमी व कुशल नेतृत्वाबरोबरीने महाराष्ट्राची भौगोलिक रचना, स्थानिक मावळ्यांचा सहभाग, निजामशाही व आदिलशाहीच्या सेवेत असताना सरदारांना मिळालेले प्रशासकीय आणि लष्करी अनुभव अशा अनेक बाबी स्वराज्य स्थापनेस साहाय्यभूत ठरल्या.

**अधिक माहितीसाठी :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची सुरुवात मावळ भागात केली. मावळचा प्रदेश डोंगराळ, दऱ्या-खोऱ्यांचा व दुर्गम होता. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधल्या खोऱ्याला 'मावळ' आणि या खोऱ्यांत राहणाऱ्या लोकांना 'मावळे' म्हणत. छत्रपती शिवाजीराजांच्या सैन्यातील मावळ्यांचा स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मोठा सहभाग होता. शिवाजी महाराजांनी तेथील लोकांच्या मनात विश्वासाची व आपलेपणाची भावना निर्माण केली. या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांना निष्ठावान सहकारी व सवंगडी मिळाले. त्यांच्या बळावरच शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे कार्य हाती घेतले. मावळमधील सहकारी कान्होजी जेधे, तानाजी मालुसरे, नेतोजी पालकर, बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे इत्यादींनी स्वराज्य स्थापनेत महत्त्वाचे योगदान दिले.

शहाजी महाराज आदिलशाहीत रुजू झाल्यानंतर त्यांनी पुणे, सुपे परगण्यांतील जहागिरीचा कारभार शिवरायांकडे सोपवला. परंतु या जहागिरीतील आणि आसपासचे किल्ले आदिलशाहीच्या ताब्यात होते. या काळात 'ज्याचे किल्ले त्याचे राज्य' अशी परिस्थिती असे. ते जाणून शिवाजी महाराजांनी किल्ले ताब्यात घेण्यास सुरुवात केली. त्यांनी तोरणा किल्ला सर करून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. किल्ले राजगड येथे शिवरायांनी स्वराज्याची पहिली राजधानी स्थापन केली. स्वराज्यविस्ताराच्या आड येणाऱ्या चंद्रराव मोरे यांचा बंदोबस्त करून महाराजांनी जावळीचा मोक्याचा प्रदेश ताब्यात घेतला. या विजयानंतर शिवाजी महाराजांच्या कोकणातील हालचाली वाढल्या. राजांच्या वाढत्या हालचालींचा धोका लक्षात आल्यामुळे विजापूर दरबाराने अफझलखान या बलाढ्य सरदारास त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले.

महाराजांना संपवण्याचा जणू विडाच उचलून आलेल्या अफजलखानाची कपटबुद्धी ओळखून शिवाजी

**अधिक माहितीसाठी :** इसवी सन १६५७ च्या सुमारास कल्याण, भिवंडी जिंकल्यानंतर स्वराज्याची सीमा समुद्राला भिडली. इंग्रज, फ्रेंच मिठाचा व्यापार करत होते. महाराजांना समुद्रावर सत्ता हवी होती. पण महाराजांजवळ लढाऊ गलबते कशी बांधायची ही माहिती नव्हती. तत्काळ त्यांनी पोर्तुगिजांशी संबंध प्रस्थापित केला. पोर्तुगिजांना सिद्दीचे भय होते. महाराजांनी त्यांना भासवले की ते सिद्दीविरुद्ध लढा देणार आहेत. रूय लैतांव व्हियेगस (Rui Leitao Viegas) व त्याचा मुलगा फेर्नाव व्हियेगस (Fernao Viegas) या लढाऊ जहाजे बांधणाऱ्या जाणकारांसोबत महाराजांनी निवडक कोळी धाडले व त्याकडून २० लढाऊ नौका तयार करून घेतल्या. महाराजांनी अशाच लोकांना पाठवले की जे प्रशिक्षित होऊन युद्धनौका तयार करण्याचे काम करू शकतील. १६७५ पर्यंत महाराजांकडे ४०० छोट्या-मोठ्या युद्धनौका होत्या. सुरतेच्या दुसऱ्या स्वारीत महाराजांनी ही गलबते सुरतेच्या किनाऱ्यावर आणली होती. सुरतेची लूट त्यावरून स्वराज्यात आणली गेली. या घटनेवरून सहज लक्षात येईल की महाराजांनी जमिनीबरोबरच समुद्रावर सत्ता स्थापन केली. महाराजांच्या या दूरदृष्टीमुळे त्यांना भारताच्या 'आरमाराचे जनक' म्हणून ओळखले जातात. त्यातून मायनाक भंडारी, दौलतखान, कान्होजी आंग्रे यांसारखे सागरी योद्धे पुढे आले.

महाराज पूर्ण तयारीनिशी प्रतापगडावर त्याला सामोरे गेले. अपेक्षेप्रमाणे अफझलखानाने दगाफटका करण्याचा प्रयत्न करताच शिवरायांनी त्याचा डाव उलटवून त्याला ठार मारले. त्याच्या बलाढ्य सैन्याला पळता भुई थोडी करून, त्याने आणलेला मोठा खजिना आणि शस्त्रसाठा ताब्यात घेतला. त्यामुळे स्वराज्याच्या तिजोरीत लक्षणीय भर पडली.

अफझलखानाचे पारिपत्य झाल्याचे समजताच विजापूर दरबाराने सिद्दी जौहरला स्वराज्यावर पाठवले. त्याने पन्हाळा किल्ल्याला वेढा घालून शिवरायांना कोंडीत पकडले. या बिकट प्रसंगी स्वराज्याचा एकनिष्ठ सेवक शिवा काशिद याने स्वतः शिवरायांचा वेष धारण करून शिवरायांचा पन्हाळा गडावरून सुटकेचा मार्ग सुकर केला. खरा प्रकार उघडकीस आल्यावर सिद्दीने शिवा काशिदला ठार केले. अशा तऱ्हेने शिवा काशिदने स्वराज्यासाठी प्राणार्पण केले. शिवरायांचा पाठलाग करणाऱ्या सिद्दी मसूदला घोडखिंडीत रोखण्याचे कार्य बाजीप्रभू देशपांडे याने केले. या प्रसंगी बाजीप्रभू देशपांडे याने वीरमरण पत्करून शिवरायांना विशाळगडावर सुखरूप पोहचू दिले.

दिल्लीच्या तख्तावर नव्याने आलेल्या औरंगजेबाने शिवरायांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेची दखल घेतली नसती तर नवल! त्याने आपला मामा शायिस्ताखान याला मोहिमेवर पाठवले. शायिस्ताखान पुणे शहरात लाल महालात मुक्कामी होता. शिवरायांनी अत्यंत हिकमतीने लाल महालात प्रवेश करून खानाची बोटे कापली. त्याला लाल महाल सोडणे भाग पडले. आत्मविश्वास वाढलेल्या शिवरायांनी औरंगजेबाची आर्थिक राजधानी मानली गेलेल्या संपन्न सुरत शहरावर हल्ला करून मोठ्या प्रमाणात लूट प्राप्त केली. या प्रकाराने संतप्त झालेल्या औरंगजेबाने मिर्झा राजे जयसिंग आणि दिलेरखान या मातब्बर सरदारांस स्वराज्यावर पाठवले. त्यांनी स्वराज्यातील अनेक किल्ले ताब्यात घेतले. प्रसंग ओळखण्यात वाकबगार असलेल्या महाराजांनी तात्पुरती माघार घेऊन पुरंदरचा तह केला. त्यानुसार महाराजांना पुत्र संभाजी राजांसह आग्रा येथे औरंगजेबाच्या भेटीस जावे लागले. तेथे औरंगजेबाने दगाबाजी करून महाराजांना नजरकैदेत ठेवले. महाराजांनी अत्यंत शिताफीने पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन सुटका करवून घेतली.

स्वराज्यात परतल्यावर शिवरायांनी अल्पावधीतच औरंगजेबाला द्यावे लागलेले किल्ले परत जिंकून घेतले.

स्वराज्याचे अस्तित्व स्वतंत्र व सार्वभौम आहे. हे स्पष्ट करण्यासाठी स्वराज्यास सर्वमान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे, हे महाराजांच्या लक्षात आले. त्यांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. शिवाजी महाराजांच्या

राज्याभिषेकानंतर जिंकलेल्या प्रदेशांना एकत्रितपणे राज्याचे स्वरूप आले. राज्याभिषेकानंतर त्यांनी कर्नाटक मोहीम राबवली. दक्षिण विजयानंतर अल्पावधीतच महाराजांचे ३ एप्रिल १६८० मध्ये रायगडावर निधन झाले. त्यांच्या निधनाने स्वराज्याची अपरिमित हानी झाली.

### १६.३ मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांनी स्वराज्य सांभाळले. त्यांचा मुघल बादशाह औरंगजेब याच्याशी सतत संघर्ष सुरू होता. याच काळात सत्तासंघर्षाच्या कारणास्तव औरंगजेबाचा मुलगा अकबर याने संभाजी महाराजांशी मैत्रीपूर्ण नाते निर्माण केले. त्याला शासन करण्याकरिता व मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्याकरिता औरंगजेब स्वतः प्रचंड सैन्य व अनुभवी सरदारांना घेऊन दक्षिणेत आला. पुढील पंचवीस वर्षे त्याने महाराष्ट्रात तळ ठोकून मराठ्यांशी युद्ध केले. परंतु तो स्वराज्य नष्ट करू शकला नाही. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना अत्यंत क्रूरपणे ११ मार्च १६८९ रोजी ठार केले. या घटनेनंतर मराठ्यांची मानसिकता दुर्बल होईल असे औरंगजेबाला वाटत होते, परंतु मराठ्यांनी एकजुटीने मुघलांशी लढा दिला व आपली सत्ता विस्तारित केली.



छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांच्या नंतर छत्रपती राजाराम महाराजांनी रायगडावर सत्तेची सूत्रे हाती घेतली. औरंगजेबाने रायगडाला वेढा घालण्यासाठी झुल्फिकारखानास पाठवले. त्याने गडाला वेढा दिला. गडावर छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई व राजपुत्र शाहू होते. छत्रपतींच्या घराण्यातील सर्वांनी एकाच वेळी एका गडावर राहणे धोक्याचे होते. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजी किल्ल्यावर जायचे आणि महाराणी येसूबाईंनी रायगड किल्ला लढवायचा असे ठरले. १६८९ मध्ये रागयड मुघलांच्या ताब्यात गेला. महाराणी येसूबाई आणि राजपुत्र शाहू यांना कैद करून दिल्लीला पाठवण्यात आले. महाराणी येसूबाई पुढील ३० वर्षे मुघलांच्या कैदेत होत्या.

जिंजीला जाताना राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्ध संघर्षाची जबाबदारी रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यावर सोपवली होती. संताजी व धनाजी यांच्या गनिमी काव्यामुळे मुघलांना आपल्या प्रचंड साधनसामग्रीचा व अवजड तोफखान्याचा उपयोग करणे कठीण झाले. फारसे किल्ले, प्रदेश व खजिना ताब्यात नसताना मराठ्यांनी मुघलांना सळो की पळो करून सोडले. अत्यंत कठीण समयी केलेले स्वराज्याचे संरक्षण ही राजाराम महाराजांची सर्वांत मोठी कामगिरी होय.


छत्रपती राजाराम महाराज

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर (मार्च १७००) त्यांची पत्नी महाराणी ताराबाई यांनी औरंगजेबाशी लढा दिला. अत्यंत विपरीत परिस्थितीत स्वराज्याचे नेतृत्व महाराणी ताराबाईंनी केले. त्यांनी सगळा कारभार एकहाती घेऊन आपल्या सरदारांच्या साहाय्याने स्वराज्य संघर्ष पंचवीस वर्षे चालू ठेवला. या काळात युद्धाचे क्षेत्र विस्तारले आणि मराठे सरदारांनी मुघलांविरुद्ध महाराष्ट्राबाहेरही संघर्ष केला. युद्धाचे पारडे बदलत चालल्याची ही खूण होती. मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम हा मुघल सत्ताधीशांनी बाळगलेली साम्राज्याची लालसा आणि मराठ्यांच्या मनातील स्वातंत्र्याची आकांक्षा यातील लढा होता.


महाराणी ताराबाई

अखेर औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा स्वातंत्र्यसंग्राम संपुष्टात आला. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या प्रारंभी मुघल सत्तेचे धोरण आक्रमक होते व मराठ्यांचे धोरण बचावाचे होते. परंतु अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ही परिस्थिती बदलली व मुघल सत्तेला नमवून मराठ्यांनी जवळजवळ भारतभर सत्ताविस्तार केला.

### १६.४ शिवकालीन राज्यव्यवस्था

स्वराज्य स्थापनेनंतर स्वराज्य विस्तारून महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड येथील प्रदेश; कर्नाटक राज्यातील बेळगाव, कारवार, धारवाड तसेच आंध्र प्रदेश, तमिळनाडू राज्यातील जिंजी, वेल्लोर आणि आसपासचा बराचसा भाग स्वराज्यात समाविष्ट झाला होता. स्वराज्याचा कारभार सुव्यवस्थित राहण्यासाठी शिवाजी महाराजांनी आदर्श राज्यव्यवस्था राबवली होती.

अष्टप्रधान मंडळाची निर्मिती व वाढ राज्याच्या विस्ताराबरोबरच होत गेली. राज्याभिषेकानंतर महाराजांनी अष्टप्रधानांची विशिष्ट पदे निर्माण केली. त्यात पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सेनापती, सुमंत, न्यायाधीश आणि पंडितराव यांचा समावेश होता.

शिवरायांच्या लष्करी व्यवस्थेत गुप्त हेरखात्याला महत्त्व होते. बहिर्जी नाईक हेरखात्याचा प्रमुख होता. कोणतीही मोहीम करण्यापूर्वी शिवराय हेरांकडून बातम्या मिळवत आणि मगच मोहिमेचा बेत आखत.

अष्टप्रधान जेव्हा स्वारीवर जात तेव्हा त्यांचे मुतालिक (प्रतिनिधी) त्यांचा कारभार पाहत होते. अष्टप्रधानांच्या कचेरीतील कामांसाठी दरकदार नेमले जात होते. त्यांत मुख्यतः दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जामदार (खजिनदार) व पोतदार (नाणेतज्ज्ञ) हे अधिकारी होते.

प्रांताच्या बंदोबस्तासाठी राज्याचे दोन विभाग केले गेले. एक सलग असणाऱ्या प्रदेशाचा व दुसरा विखुरलेल्या दक्षिणेकडील प्रदेशाचा. पहिल्या मुलखाचे तीन भाग केले. पेशव्यांकडे उत्तरेकडील प्रदेश दिला त्यात साल्हेरपासून पुण्यापर्यंतचा वरघाट व उत्तर कोकणाचा समावेश होता. मध्यविभागात दक्षिण कोकण, सावंतवाडी व कारवार हा भाग होता. हा सचिवाकडे सोपवण्यात आला. तिसऱ्या भागात पूर्वेकडील वरघाटाचा प्रदेश म्हणजे सातारा-वाई ते बेळगाव आणि कोप्पळपर्यंतचा प्रदेश हा भाग मंत्र्यांकडे सोपवण्यात आला. कर्नाटकाचा स्वतंत्र सुभा करून त्यावर हंबीरराव मोहिते व रघुनाथ नारायण अमात्य यांची नेमणूक केली गेली. या सर्व विभागांवर सरसुभेदारांची नेमणूक होई व ते प्रधानांबरोबर काम करत. यास 'राजमंडळ' म्हणत. किल्लेदार व कारकून वर्गाची नेमणूक स्वतः महाराज करत. दरवर्षी प्रधानांनी महाराजांना हिशोब सादर करायचा अशी व्यवस्था असे.

विभागीय कारभारात सरसुभेदार मदत करत, त्यांना देशाधिकारी म्हणत. मुसलमानी राजवट व शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था यांतील मुख्य फरक म्हणजे

**अधिक माहितीसाठी : शिवशाही धारापद्धत-शिवकाठी :** जमिनीची धारा (प्रत) ही सर्वांत महत्त्वाची बाब होती. जमिनीवरील शेतसारा ठरवण्यासाठी पूर्वी निजामशाहीतील मलिक अंबर याने ठरवलेली पद्धत अमलात आणली गेली होती. पण ती शिवाजी महाराजांनी बदलून वेगळी पद्धत लागू केली. त्यांनी जमिनीचे मोजमाप ठरवण्यासाठी काठीचे माप ठरवले. पाच हात व पाच मुठी मिळून एक 'काठी'. वीस काठ्यांच्या औरस-चौरसांचा (लांबी-रुंदीचा) एक 'बिघा' व १२० बिघ्यांचा एक 'चावर' असे जमिनीचे मोजमाप ठरवले. अण्णाजी दत्तो (सचिव) यांनी गावोगावी जाऊन जमिनीच्या संबंधातील जमिनीचा 'धारा', 'चावराणा', 'प्रतबंदी' इत्यादी बाबी लावणीवरून ठरवल्या. चावराणा म्हणजे जमीन मोजून तिच्या सीमा ठरवणे. डोंगरी जमिनीच्या साऱ्याची आकारणी बिघ्यावर न करता नांगरावर होई. आकारणीत जमिनीच्या कसाबरोबर पिकाची प्रतही पाहण्यात येई. आकार (सारा) ठरवताना तीन वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी घेऊन मगच सारा ठरवण्यात येई. वाजट (पडीक) जमीन, जंगल, कुरण इत्यादी गावची जमीन साऱ्यासाठी विचारात घेतली जात नसे.

सरसुभे महसुली विभाग नसून कारभार व्यवस्थेसाठीच केले गेले. त्यामुळे सुभेदार मनमानी करू शकत नसत.

सुभेदारास सरकारी करवसुलीचे कामी प्रजेचे परंपरागत अधिकारी, परगण्याचे देशमुख व देशपांडे यांच्यावर अवलंबून राहावे लागत होते. जमिनीची लागवड व वसाहत करवून सरकारचा सारा गोळा करणे हे देशमुखाचे मुख्य काम असे. सर्व सरकारी अधिकाऱ्यांना वतन न देता रोख वेतन दिले जात होते.

गाव हे राज्यव्यवस्थेत महत्त्वाचे घटक होते. नवीन गावे वसवली जाऊ लागली. तेथील रयतेला कसण्यास गुरेढोरे, बीजासाठी दाणा-पैका, उदरनिर्वाहासाठी दाणा-पैका देण्यात येई व तो ऐवज दोन वर्षांनी जेव्हा पीक येई तेव्हा कापून घेतला जाई. या पद्धतीला 'तगाई पद्धत' म्हणत असत.

### १६.५ शाहू महाराजांची सुटका

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर देखील मुघलांचे मराठ्यांना पराभूत करण्याचे प्रयत्न सुरूच होते. मराठ्यांमध्ये फूट पाडून त्यांचा पराभव करण्याचा प्रयत्न मुघलांनी केला. त्यासाठी मुघलांच्या कैदेत असलेल्या शाहू महाराजांची त्यांनी सुटका इ.स.१७०७ मध्ये केली. या सुटकेनंतर महाराणी ताराबाई आणि शाहू यांच्यात युद्ध झाले. त्यात शाहू महाराजांचा विजय झाला. त्या वेळी शाहू महाराजांच्या पक्षात महत्त्वाची कामगिरी बजावणारे बाळाजी विश्वनाथ यांची पेशवेपदावर नेमणूक झाली. तेव्हापासून पेशवे काळ सुरू झालेला दिसून येतो.



छत्रपती शाहू महाराज

### १६.६ पेशवेकाळ

बाळाजी विश्वनाथांच्या नंतर पहिला बाजीराव यांना पेशवे पदावर नियुक्त केले गेले. त्यांच्या कारकिर्दीत मराठी साम्राज्याचा विस्तार माळवा, राजस्थान आणि बुंदेलखंडामध्ये झाला. त्यांनी निजामाला नामोहरम केले. पहिला बाजीराव यांच्यानंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांना पेशवेपद बहाल केले. या काळात झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. मराठ्यांची सत्ता दुर्बल झाली.



पहिला बाजीराव पेशवा

मराठी सत्तेची घडी पुन्हा एकदा बसवण्याचा प्रयत्न माधवराव पेशव्यांनी केला. पानिपतचा पराभव हा केवळ राजकीय पराभव नसून त्याचा मोठा परिणाम मराठ्यांच्या मानसिकतेवर देखील झालेला दिसून येतो. मराठ्यांमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण करण्याचे तसेच उत्तरेमध्ये मराठ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न माधवरावांनी केले. पानिपतचा मोठा पराभव पचवून उत्तरेच्या राजकारणात धैर्याने उभे राहण्यात मराठे यशस्वी झाले. ही बाब अत्यंत महत्त्वाची होती. यामध्ये मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, रघूजी भोसले, महादजी शिंदे, नाना फडणवीस यांचा मोलाचा वाटा आहे.




माधवराव पेशवा

मल्हारराव हे इंदौरच्या घराण्याचे संस्थापक होते. त्यांनी दीर्घकाळ मराठी राज्याची सेवा केली. पानिपतच्या युद्धानंतर उत्तरेत मराठ्यांची प्रतिष्ठा सावरण्यात त्यांचा मोठा वाटा होता. मल्हाररावांचा पुत्र खंडेराव याच्या मृत्यूनंतर



मल्हारराव होळकर





**अधिक माहितीसाठी :** अफगाणिस्तानातून आलेले पठाण हिमालयाच्या पायथ्याशी अयोध्येजवळ स्थायिक झाले होते. या पठाणांना रोहिले म्हणतात. रोहिलखंड या नावाने हा प्रदेश ओळखला जातो. नजीब खान हा रोहिल्यांचा सरदार होता. उत्तर भारतातील मराठ्यांचे वर्चस्व त्याला मान्य नव्हते. त्याने अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशाह अब्दाली याला भारतात येण्यास निमंत्रित केले. त्याच्या सांगण्यावरून अब्दालीने भारतावर स्वारी केली. प्रचंड प्रमाणात लूट करून तो परतला. परंतु मराठ्यांनी त्याच्या सैन्याचा अटकेपर्यंत पाठलाग केला व अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला. अटक हे सध्याच्या पाकिस्तानात आहे.

इंदौरच्या कारभाराची सूत्रे अहिल्याबाई होळकर यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या काळात महेश्वर हे राज्यकारभाराचे प्रमुख केंद्र होते. त्यांनी भारतात महत्त्वाची धार्मिक स्थळे, मंदिरे, घाट, धर्मशाळा, पाणपोई यांची उभारणी केली. त्या प्रजाहितदक्ष, लोककल्याणकारी आणि उत्कृष्ट प्रशासक होत्या.


अहिल्याबाई होळकर

नागपूरकर भोसल्यांपैकी रघूजी भोसले हे सर्वांत कर्तबगार होते. त्यांनी पूर्व भारतात बंगालपर्यंत मराठी सत्तेचा दरारा निर्माण केला. पानिपतच्या पराभवानंतर उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व आणि प्रतिष्ठा निर्माण करण्याची


रघूजी भोसले



महादजी शिंदे

कामगिरी महादजी शिंदे यांनी केली. त्यांनी फ्रेंच लष्करी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आपली फौज प्रशिक्षित केली आणि आपला तोफखाना सुसज्ज केला. महादजींनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठ्या जिद्दीने इ.स.१७७१ ते १७९४ या काळात दिल्लीचा कारभार सक्षमपणे पाहिला. माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्याची घडी नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनी बसवली.

पेशवा माधवरावांनंतर गादीवर आलेले नारायणराव आणि सवाई माधवराव हे दोन्ही पेशवे अल्पायुषी ठरले. त्यांच्या अकाली मृत्यूनंतर मात्र मराठ्यांच्या सत्तेचा ऱ्हास सुरू झाला. या सुमारास मुघलांची सत्ता देखील दुर्बल झालेली होती. या परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांनी मराठ्यांच्या राजकारणात शिरकाव केला. शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव याच्या काळात मराठा इंग्रजांमध्ये झालेल्या युद्धात मराठ्यांची सत्ता पूर्णपणे नष्ट झाली आणि भारतावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. इंग्रजांनी सर्व भारत आपल्या आधिपत्याखाली आणला.

### १६.७ कला, स्थापत्य, साहित्य

**कला :** सचित्र हस्तलिखित पोथ्या, पटचित्रे व चित्रित पत्रिका, लघुचित्रे आणि काचचित्रे या विविध स्वरूपांत मराठी चित्रकलेचा आविष्कार झालेला आढळतो. 'भगवद्गीता', 'सप्तशती', 'भागवतपुराण' अशा काही संस्कृत आणि 'ज्ञानेश्वरी', 'शिवलीलामृत', 'पांडवप्रताप' अशा काही मराठी ग्रंथांची सचित्र हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यांतून दशावताराची चित्रे आढळतात. पोथ्यांच्या फळ्यांवर गणपती, ऋद्धिसिद्धी, रामपंचायतन, गोपालकृष्ण, विष्णुलक्ष्मी यांची चित्रे गडद अशा लाल, हिरव्या आणि पिवळ्या रंगांनी चित्रित केली आहेत. लघुचित्रांमध्ये व्यक्तिचित्रे, रागमाला, तालमाला, मिरवणुकी इत्यादी प्रसंगांची चित्रे आहेत. थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, पिलाजी जाधवराव यांची उत्कृष्ट व्यक्तिचित्रे उपलब्ध आहेत. चित्रकाम बहुधा वाड्यांच्या दर्शनी भागांवर तसेच दिवाणखान्याच्या व शयनगृहांच्या भिंतीवर आढळून येते. देवालयात मंडपाच्या भिंती, ओवऱ्या, शिखरे, गाभाऱ्याच्या भिंती आणि छत ही सुद्धा चित्रकामाने सुशोभित केलेली दिसतात. वाठारचा नाईक निंबाळकरांचा वाडा, मेणवलीचा नाना फडणवीसांचा वाडा, चांदवडचा रंगमहाल, मोरगावचे मयूरेश्वर मंदिर, पांडेश्वरचे शिवमंदिर, बेनवडीचा मठ अशा काही ठिकाणी अद्यापही अठराव्या शतकातील भित्तिचित्रे आहेत. या भित्तिचित्रांचे विषय मुख्यत: पौराणिक आहेत. त्यांत रामायण, महाभारत आणि पुराणे यांतील प्रसंग आहेत. दशावतार आणि कृष्णलीलांची चित्रे सर्वत्र आढळतात. तत्कालीन सामाजिक जीवनातील प्रसंगही लोकप्रिय होते. राजसभा, राजपुरुषांची भेट, मिरवणुकी यांचा यात समावेश होतो.



लघुचित्र – मराठी चित्रकला

मराठी अमलात मुख्यतः भजन–कीर्तन होई. वीरवृत्ती निर्माण करणारे पोवाडे, वाङ्मय या काळात तयार झाले. ऐतिहासिक काव्य शाहिरांच्या पोवाड्यातून व कटावातून निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अज्ञानदास याने अफझलखान वधाविषयी रचलेला आणि तुळसीदासाने सिंहगडच्या लढाईचा

रचलेला पोवाडा प्रसिद्ध आहे.

उत्तर पेशवाईत लावणी वाङ्मयाला बहर आला. या क्षेत्रात अनंतफंदी, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ व होनाजी बाळा यांनी मोठा लौकिक मिळवला.

मराठेशाहीत लावणीनृत्य, कोळीनृत्य, गजनृत्य, वाघ्या मुरळीचे नृत्य, वासुदेवाचे नृत्य यांची जोपासना झाली. संगीत कलेची उपासनाही केली गेली.

**स्थापत्य :** शिवाजी महाराजांनी दुर्ग-स्थापत्याला प्राधान्य दिले. त्यांनी डोंगरी किल्ले व जलदुर्ग बांधले. त्याचा उपयोग महाराजांना स्वराज्य उभारणीसाठी झाला. त्यांच्या पदरी या विषयातील जाणकार देखील होते. पुण्यातील कसबा गणपती व विठ्ठलवाडीचा विठोबा या मंदिरांचा वीरमाता जिजाबाईंनी जीर्णोद्धार केला. पेशवे काळात राज्यात संपन्नता आली आणि सर्व प्रकारच्या कलाशिल्पाला नवचैतन्य प्राप्त झाले. पुणे, सातारा, नाशिक या शहरांची वाढ झाली. सगळीकडे फरसबंद रस्ते, दुतर्फा चिरेबंद वाडे, मधूनच कमानदार वेशी असे चित्र दिसू लागले.

उत्तर पेशवाईत मंदिर बांधणीला मोठ्या प्रमाणावर आरंभ झाला. ही मंदिरे तीन प्रकारची आहेत. यादवकालीन घाटाची मंदिरे सासवड (वटेश्वर, संगमेश्वर), माहुली (विश्वेश्वर), जेजुरी अशा ठिकाणी दिसतात. ती आकाराने मोठी असत. त्या मंदिराचे विधान तारकाकृती असे, मंदिराचे जोते अनेक थरांनी बांधले जात होते व त्याला विविध नावे असत. शिखरांचे बांधकाम विटांचे असे आणि ते चुनेगच्ची पद्धतीने केलेले असे. नाशिकचे काळाराम, गोराराम, सुंदरनारायण, त्र्यंबकेश्वर येथील महादेवाचे तसेच नेवाशाचे मोहिनीराज ही मंदिरे माळवा-राजस्थानमधील मंदिरांसारखी आहेत. या मंदिरांची संपूर्ण बांधणी दगडी होती. या मंदिरांमध्ये इतर प्रकारच्या मंदिरांपेक्षा कोरीवकाम अधिक आहे. तिसऱ्या प्रकारात पुणे, सातारा, वाई, यांसारख्या ठिकाणांच्या मंदिरांची बांधणी खास पद्धतीची होती. या पद्धतीच्या वैशिष्ट्यांमध्ये चौकोनी गाभारा, कमानींची व त्यासमोर लाकडी सभामंडप, गाभारा यांचा समावेश होतो. शिखर टप्प्याटप्प्याने निमुळते होत जाते. शिखरांवर लहान कोनाड्यांतून चुनेगच्चीमध्ये मूर्तिकाम केलेले असून मूर्ती सुबक व उठावदार असतात. यामध्ये दशावतार, देव-देवतांच्या मूर्ती, स्त्रिया आणि पुरुष यांच्या मूर्ती आहेत. दगडी दीपमाळा हे मंदिरांचे खास

**अधिक माहितीसाठी :** वाड्यांच्या बांधकामात कच्च्या व पक्क्या विटा वापरत. वाड्यांचा तळमजला दगडी तर वरचे मजले विटांचे असत. लाकडी खांब-तुळया यांवर आधारलेले सामान्यपणे तीन किंवा पाच मजले असत. प्रशस्त अशा मोकळ्या चौकांभोवती खोल्या बांधल्या जात. वाड्यांमध्ये बहुधा दोन चौक असत. काही वाड्यांमध्ये तीन ते सात चौक देखील असत. पुण्याचा विश्रामबाग वाडा, मेणवलीचा नाना फडणवीसांचा वाडा आणि कोपरगावचा राघोबाबादादांचा वाडा या मोठ्या वाड्यांना अनेक चौक होते. वाड्यामधील खांब आणि तुळया चौकोनी असत. त्यात भौमितिक नक्षीच्या जोडीला वेलपत्ती व मधेमधे पोपट, मोर, माकडे यांच्या आकृती असत.



सिंधुदुर्ग



जेजुरी

वैशिष्ट्य आहे. जेजुरी येथील दीपमाळा शहाजीराजांनी बांधलेल्या आहेत. बहुतेक गावे व मंदिरे नद्यांच्या काठी असल्याने मंदिरांच्या समोरच्या नदीतीरावर दगडी घाटही बांधण्यात आले. नाशिक, पुणतांबे, वाई, मेणवली, माहुली इत्यादी ठिकाणी असे विस्तीर्ण घाट दिसतात. अनेक ठिकाणी बांधलेल्या छत्र्या (समाधी) लक्षणीय आहेत.

**साहित्य :** या काळात मराठी साहित्याचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. समकालीन संत तुकाराम वारकरी संप्रदायातील प्रमुख आध्यात्मिक कवी होते. त्यांनी रचलेल्या अभंगांमुळे समाजावर मोठा प्रभाव पडला. समर्थ रामदासांनी मराठीमध्ये 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' लिहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी फारसी शब्दांना पर्यायी संस्कृत शब्द असणारा 'राज्यव्यवहारकोश' हा ग्रंथ तयार करवून घेतला. छत्रपती संभाजी महाराज हे स्वतः उत्तम साहित्यिक आणि संस्कृत भाषेचे उत्तम जाणकार होते. छत्रपती संभाजी महाराजांनी 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. राजनीतीवरील प्राचीन भारतीय ग्रंथांचे अवलोकन करून त्याचे सार संभाजी महाराजांनी बुधभूषण या ग्रंथात मांडले. संभाजी महाराजांना संस्कृतसह अनेक भाषा अवगत होत्या. 'नायिकाभेद', 'नखशीख' आणि 'सातसतक' हे ब्रज भाषेतले ग्रंथ त्यांनी लिहिले. महम्मद कासीम फेरिस्ता याने बारा खंडात 'गुलशने इब्राहिमी' हा हिंदुस्तानाचा इतिहास लिहिला.

अठराव्या शतकात वामन पंडित यांनी 'यथार्थदीपिका', रघुनाथ पंडित यांनी 'नलदमयंती स्वयंवर', श्रीधर नाझरेकर यांनी 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'रामविजय' आणि मोरोपंत यांनी अनुवाद केलेला 'महाभारत' यासारख्या अनेक सुप्रसिद्ध साहित्यकृती निर्माण झाल्या. जुन्या मराठी ऐतिहासिक साहित्यातील ग्रंथांमध्ये बखर साहित्य महत्त्वपूर्ण आहे. शूरवीरांचे गुणगान, ऐतिहासिक घडामोडी, लढाया, थोर पुरुषांची चरित्रे यांविषयीचे लेखन आपणांस बखरीत वाचायला मिळते. उदा., 'सभासद बखर', 'भाऊसाहेबांची बखर, 'पानिपतची बखर'. पेशवे काळात कृष्ण दयार्णव आणि श्रीधर हे प्रमुख कवी होते. महिपतीचा 'भक्तिविजय' हा ग्रंथ याच काळातील आहे.

### १६.८ व्यापार, उद्योग व समाजजीवन

व्यापारउदीमावर राज्याची आर्थिक भरभराट अवलंबून असते याची जाण छत्रपती शिवाजी महाराजांना होती. त्यांनी ठिकठिकाणी पेठा वसवून व्यापाऱ्यांना व उद्योजकांना प्रोत्साहन दिले होते. या पेठांवर शेटे व महाजन हे वतनी अधिकारी नेमले जात असत. चौल, राजापूर, दाभोळ, केळशी, रत्नागिरी ही या काळातील काही महत्वाची बंदरे व व्यापारी उलाढालीची केंद्रे होती. दाभोळ येथून मिरे, लाख व जाडेभरडे कापड इत्यादी गोष्टी निर्यात केल्या जात. चौल येथून रेशमी कापड, अफू व नीळ या वस्तू निर्यात केल्या जात असत. राजापूर येथून मिरे, वेलदोडे, सुती कापड यांचा व्यापार होत असे. राजापूर येथून माल भरून परदेशी

**अधिक माहितीसाठी :** स्वराज्यातील उद्योगांना संरक्षण देण्याचे शिवाजी महाराजांचे धोरण होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिठाचा उद्योग होय. त्यांनी कोकणातील मीठ उद्योगाला संरक्षण दिले. त्या वेळी पोर्तुगिजांच्या ताब्यातील प्रदेशातून स्वराज्यात मिठाची आयात मोठ्या प्रमाणात होत असे. त्यामुळे कोकणात उत्पादित होणाऱ्या मिठाच्या विक्रीवर प्रतिकूल परिणाम होतो. हे ध्यानात घेऊन महाराजांनी पोर्तुगिजांच्या प्रदेशातून स्वराज्यात येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली. पोर्तुगिजांकडून येणारे मीठ महाग होऊन त्याच्या आयातीत घट व्हावी आणि स्थानिक मिठाची विक्री वाढावी हा त्या मागचा हेतू होता.

व्यापाऱ्यांची जहाजे तांबडा समुद्र व इराणच्या आखाताकडे जात असत.

गाव अथवा खेडे हे स्वराज्यातील एक महत्वाचा घटक होते. ते सर्व बाबतींत स्वयंपूर्ण असे. त्यामुळेच राज्य कोणाचेही असले तरी त्या भागातील अर्थव्यवस्थेवर फार परिणाम होत नसे. प्रत्येक खेड्यात बारा बलुतेदार असत. त्यांचे व्यवसाय वंशपरंपरेने ठरलेले असत. बलुतेदारी पद्धतीमधील प्रत्येक व्यवसायाला समाजात निश्चित असे एक स्थान होते. सोनार, लोहार, तांबट इत्यादी बलुतेदार आपापला व्यवसाय सांभाळत असत. मोठ्या खेड्यात आठवड्याचा बाजार भरवला जात असे. अशा खेड्याला कसबा असे म्हटले जाई. त्यात लोक दैनंदिन गरजेच्या लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यास येत असत. कापड उद्योग, धातुकाम, साखर उद्योग असे काही उद्योग अस्तित्वात होते.

तत्कालीन महाराष्ट्रातील समाजात सरदार, वतनदार, बलुतेदार आणि रयत असे वर्ग होते. ग्रामीण भागात रयतेमध्ये शेतकऱ्यांची संख्या अधिक होती. महाराष्ट्रात वाई, नाशिक, पैठण इत्यादी ठिकाणी पाठशाळा चालवल्या जात असत. समाजामध्ये पारंपरिक सण, उत्सव, व्रत वैकल्ये इत्यादी उत्साहाने साजरे केले जात. सण उत्सवांना राज्यव्यवस्थेकडून देखील प्रोत्साहन मिळत असे कारण अशा प्रकारच्या सामाजिक उत्सवांमुळे लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण होण्यास मदत होते व ऐक्याचे वातावरण निर्माण होत असे.

**अधिक माहितीसाठी : मराठेकालीन शहरीकरण–**राजकीय विस्तार आणि व्यापारी हालचाली यातून मराठी राज्यात शहरीकरणाचा विकास झाला असे दिसून येते. विविध उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय यांच्या निमित्ताने अनेक शहरे उदयास आली. पेशवे काळात शहरीकरणाचे प्रमाण अधिक वाढले. पेशव्यांनी पुणे ही आपली राजधानी केल्यामुळे पुण्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. अनेक बाजार पेठांची संख्या वाढली. पुणे, इंदापूर, सासवड, जुन्नर, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पैठण, कोल्हापूर, सातारा, अहमदनगर, कोकणातील समुद्रकिनाऱ्यावरील अनेक लहान मोठी बंदरे ही व्यापार उद्योगाच्या निमित्ताने भरभराटीला आलेली होती.

मराठ्यांच्या स्वराज्यस्थापनेपासून ते साम्राज्य विस्तारापर्यंतचा प्रवास हा मध्ययुगीन भारतातील महत्त्वाचा घटक आहे. मराठ्यांची सत्ता संपुष्टात आली व इंग्रजांनी बहुतांश भारत आपल्या आधिपत्याखाली आणला. अनेक क्षेत्रांत स्थित्यंतरे घडून आली. मध्ययुगातून आधुनिक कालखंडाकडे भारताची वाटचाल सुरू झाली.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. भारतातील आरमाराचे जनक म्हणून .......... ओळखले जातात.
   (अ) छत्रपती शिवाजी महाराज
   (ब) छत्रपती संभाजी महाराज
   (क) छत्रपती राजाराम महाराज
   (ड) छत्रपती शाहू महाराज

२. अफगाणिस्तानातून आलेले पठाण हिमालयाच्या पायथ्याशी ........ जवळ स्थायिक झाले होते.
   (अ) वाराणसी (ब) मथुरा
   (क) अयोध्या (ड) दिल्ली

३. छत्रपती संभाजी महाराजांनी ......... हा संस्कृत ग्रंथ लिहिला.
   (अ) नायिकाभेद (ब) बुधभूषण
   (क) नखशीख (ड) सातसतक

**(ब) 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| १. | नाईक निंबाळकरांचा वाडा | वाठार |
| २. | नाना फडणवीसांचा वाडा | मेणवली |
| ३. | काळाराम मंदिर | जेजुरी |
| ४. | मोहिनीराज मंदिर | नेवासे |


**(क) नावे लिहा.**

१. स्वराज्यातील जमाखर्च ठेवणारा -

२. विभागीय कारभारात मदत करणारा -

३. रोहिल्यांचा सरदार -

**प्र.२ पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. शहाजीराजांना स्वराज्याचे संकल्पक म्हटले जाते.

२. छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमारदल उभारले.

३. छत्रपती शिवाजी महाराजांनी पोर्तुगिजांकडून येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली.

**प्र.४ टीपा लिहा.**

१. मराठाकालीन कला

२. मराठाकालीन स्थापत्य

**उपक्रम**

१. मध्ययुगातील कर्तबगार स्त्रियांची माहिती मिळवून वर्गात सादर करा व त्यावर चर्चा घडवून आणा.

२. महाराष्ट्रातील कोणत्याही एका किल्ल्यावर माहितीपट (Documentary) तयार करा व वर्गात सादर करा.